# १. मोटार वाहनाचा अपघात झाल्यानंतर काय कराल

आपल्या वाहनाचा अपघात झाल्यानंतर गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला जवळच्या रुग्णालयात नेण्याची जबाबदारी ही कायद्यानुसार वाहन चालकावर सोपविण्यात आलेली आहे. त्यानंतर वाहनधारकाने जवळच्या पोलिस ठाण्यामध्ये अपघाताची वर्दी देण्याची जबाबदारीही त्यांचीच आहे. जोपर्यंत अपघातग्रस्त वाहनाचा पंचनामा व वाहनाची तपासणी घटनास्थळी होत नाही तो पर्यंत वाहन हलविण्यात येऊ नये ही वाहनचालकाची जबाबदारी आहे. पोलिस अधिका-यांना अपघातग्रस्त वाहनाचे कागदपत्र उदा :- विमा, अनुज्ञप्ती व इतर कागदपत्रे सादर करावीत व तपासणी अधिका-याला योग्य ते सहकार्य करावे.

मोटार वाहन अपघात दावा न्यायाधिकरण येथे नुकसान भरपाई करिता खटला दाखल करु शकतात. याकरीता पोलीस अहवाल आवश्यक आहे.

